# चित्रकार शंकर पळशीकर यांचा चित्रसंग्रह प्रकाशित

मुंबई, गुरुवार (ला. प्र.)— सुप्रसिद्ध चित्रकार कै. शंकर पळशीकर यांच्या "शंकर पळशीकर" या ऐंशी पानी चित्रसंग्रहाचे प्रकाशन राज्यपाल डॉ. शंकर दयाळ शर्मा यांच्या हस्ते आज राजभवन येथे संपन्न झाले. हे पुस्तक महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळातर्फे छापण्यात आलेले आहे.

या पुस्तकाचे मुद्रण व त्यातील चित्रांचे मुद्रांकन अतिशय सुबक असून छापण्यात आलेली रंगीत चित्रे आणि एस. व्ही. वासुदेव यांनी मांडलेले पळशीकरांचे जीवनचरित्रामुळे अभ्यासकांना त्यांच्या कार्याची ओळख होईल, असे राज्यपाल म्हणाले.

कला शिक्षण क्षेत्रात एक प्रतिभाशाली शिक्षक म्हणून कार्य करीत असतानाच चित्रकार ह्या नात्याने त्यांनी सातत्याने कलानिर्मिती करून एक सिद्धहस्त व्यक्तिचित्रकार म्हणून त्यांनी कलाक्षेत्रात अमूल्य भर टाकली असे गौरवोद्‌गार काढून राज्यपाल पुढे म्हणाले की, अशा या थोर कलावंत शिक्षकांच्या कार्याची दखल महाराष्ट्र शासनाने ह्या पुस्तकाच्या निमित्ताने घेतली ही अभिनंदनीय बाब आहे. त्यांच्या कुंचल्यातून निर्माण झालेल्या बहुसंख्य उत्कृष्ट कलाकृती अनेक पिढ्यांना मार्गदर्शक ठरतील असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

मंडळाचे अध्यक्ष डॉ. सुरेंद्र बारलिंगे यांनी आपल्या प्रास्ताविकात विदर्भात जन्मलेल्या पळशीकरांनी स्वकर्तृत्वाच्या बळावर उभ्या भारत देशाला अभिमान वाटेल असे कला योगदान दिल्याचा उल्लेख करून राष्ट्रीय कला अकादमीने 'एमिनन्ट आर्टिस्ट ऑफ इंडिया' म्हणून पळशीकराचा गौरव केल्याचे व इटालीच्याही कला अकादमीने त्यांना सभासदत्व आणि सुवर्णपदक बहाल केल्याची माहिती दिली.

तसेच कै. पळशीकर यांनी सर जे. जे. स्कूल ऑफ आर्टमध्ये प्रथम फेलो म्हणून व नंतर प्राध्यापक म्हणून जवळजवळ ३० वर्षे कलाशिक्षणाची सेवा केली व शेवटची आठ वर्षे अधिष्ठाता होते.

याप्रसंगी कै. शंकर पळशीकर यांच्या पत्नी श्रीमती सुभार्या पळशीकर व अनेक कलाकार व मान्यवर उपस्थित होते. शेवटी मंडळाचे सचिव श्री. पंढरीनाथ पाटील यांनी आभारप्रदर्शन केले. श्रीमती मधुमाला चावला यांच्या पसायदानाने कार्यक्रमाचा शेवट झाला.

## जैन मुनी महासेन विजयराज यांचे निधन

राजकोट, दि. १८ (पी. टी. आय.) — आराधनाधामचे जैन मुनी श्री महासेन विजयराज महाराज यांचे काल मेंदूतील रक्तस्त्रावामुळे जामनगर येथे निधन झाले. ते ७२ वर्षांचे होते.